महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ◆ १० सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०७८ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## थोडक्यात बातम्या

### ठाणे मनपाच्या प्रभागरचना हरकतींवर आज सुनावणी

**दिव्यातून सर्वाधिक हरकती**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे पालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या निर्देशानुसार पालिका प्रशासनाने प्रारूप प्रभाग रचना जाहीर केली होती. या प्रभाग रचनेसंदर्भात हरकती सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार शेवटच्या दिवशी ४ सप्टेंबरपर्यंत २७० हरकती सूचना प्राप्त झाल्या होत्या. यामध्ये सर्वाधिक १२२ हरकती या एकट्या दिवा प्रभाग समितीतील असल्याची माहिती सूत्रांनी दिली. या प्राप्त हरकतींवर बुधवार (ता. १०) महापालिकेच्या नरेंद्र बल्लाळ सभागृहात सुनावणी पार पडणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

२०१७ साली झालेल्या निवडणुकीत चार सदस्यांचा एक प्रभाग अशी रचना होती. त्यात ३२ प्रभाग चार सदस्यांचे तर, एक प्रभाग तीन सदस्यांचा होता. अशी एकूण ३३ प्रभागातून १३१ नगरसेवक निवडून आले होते. यंदाच्या निवडणुकीत हीच रचना कायम ठेवण्यात आल्याने प्रभाग आणि नगरसेवक संख्येत वाढ झालेली नाही. यात चार सदस्यांच्या प्रभाग रचनेत ५० ते ६२ हजार लोक लोकसंख्येचा एक प्रभाग तयार करण्यात आला आहे. तर, तीन सदस्यांचा प्रभाग ३८ हजार लोकसंख्येचा करण्यात आला आहे. या प्रारुप आराखड्यावर पालिकेने नागरिकांकडून हरकती व सूचना मागवल्या आहेत. हरकती व सूचना सादर करण्यासाठी ४ सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यातच या कालावधीत गणेशोत्सव आल्याने सुरुवातीला हरकती सूचनांचा ओघ कमी असल्याचे दिसून आले. तर, गौरी-गणपती विसर्जनानंतर हरकती व सूचनांचा ओघ वाढू लागल्याचे दिसून आले. अशातच ४ सप्टेंबर या शेवटच्या दिवशी सुमारे २०० हून अधिक हरकती नोंदविल्या गेल्या. त्यामुळे अखेरच्या दिवशी एकूण २७० हरकती व सूचना पालिका प्रशासनाकडे प्राप्त झाल्या. यामध्ये लोकसंख्या वाढीच्या तर, काही ठिकाणी हद्द विभागली गेल्याच्या तक्रारी अधिक असल्याची माहिती सूत्रांनी दिली.दरम्यान, दिवा प्रभाग समितीतील प्रभाग क्र. २९ मध्ये २७ व २८ मधील भागांचा जबरदस्ती समावेश केला आहे. यामुळे भौगोलिक सलगता तुटली असून लोकसंख्या असमतोल निर्माण झाल्याची देखील तक्रारीत समावेश असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### मेट्रो चारने ठाणेकरांचा दक्षिण मुंबईचा प्रवास होणार सुलभ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या मेट्रो ११ मार्गाला राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. वडाळा डेपो ते गेटवे ऑफ इंडिया या १६ किलोमीटर लांबीच्या मेट्रो मार्गिकमुळे मुंबईकरांसाठी वाहतुकीचे सक्षम जाळे उभे राहणार आहे; पण ठाण्याहून मेट्रो चारने निघालेल्या ठाणेकरांना वडाळा स्थानकातून मेट्रो ११तून पुढे दक्षिण मुंबईपर्यंत प्रवास करणे सुलभ होणार आहे.मध्य रेल्वे लाइफलाइन समजली जाते तर लोकलच्या घड्याळावर धावणारा चाकरमानी मुंबईचा आत्मा समजला जातो. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते थेट ठाणे, कल्याण, बदलापूर आणि कसारा- कर्जतपर्यंत हे जाळे पसरले आहे. कितीही जीवघेणा प्रवास असला तरी त्याला पर्याय नसल्याने दररोज लाखो प्रवासी जीव मुठीत घेऊन लोकलने प्रवास करतात. लोकलचा हा भार कमी करण्यासाठी मुंबई-ठाण्यात मेट्रोचे जाळे विणले जात आहे. त्यापैकी मेट्रो चार हा मार्ग वडाळा- घाटकोपर- ठाणे कासारवडवलीपर्यंत धावणार आहे. ठाण्यात या मार्गाची चाचपणी सप्टेंबरअखेरपर्यंत करण्याचे नियोजन असून त्या दृष्टीने काम सुरू आहे.

# सी.पी.राधाकृष्णन भारताचे नवे उपराष्ट्रपती


## इंडिया आघाडीच्या बी. सुदर्शन रेड्डी यांचा पराभव !

**राधाकृष्णन यांना पहिल्या पसंतीची ४५२ मते तर विरोधी उमेदवार रेड्डी यांना ३०० मते**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : भारताचे नवे उपराष्ट्रपती म्हणून राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) उमेदवार आणि महाराष्ट्राचे राज्यपाल चंद्रपुरम पोन्नुसामी (सीपी) राधाकृष्णन यांची निवड झाली. मंगळवारी (दि. ९) झालेल्या निवडणुकीत त्यांचा विजय झाला असून त्यांनी इंडिया आघाडीचे उमेदवार आणि माजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांचा पराभव केला.

राज्यसभेचे सरचिटणीस पी.सी. मोदी यांनी निकाल जाहीर करताना सांगितले की, राधाकृष्णन यांना ४५२ पहिल्या पसंतीची मते मिळाली, तर विरोधी उमेदवार रेड्डी यांना ३०० मते मिळाली. या विजयामुळे एनडीएने उपराष्ट्रपतीपदावर आपली पकड कायम ठेवली आहे.





१९७० च्या दशकात राष्ट्रीय स्वयंसेवक संघातून कार्य सुरू करत त्यांनी नंतर भाजपमध्ये प्रवेश केला. २००४ ते ०७ दरम्यान ते भाजप तामिळनाडू प्रदेशाध्यक्ष होते. कोइम्बतूर मतदारसंघातून ते दोनदा लोकसभेवर निवडून आले, जी कामगिरी तामिळनाडूमध्ये भाजप नेत्यांसाठी दुर्मिळ मानली जाते.

राधाकृष्णन यांनी बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशनची पदवी घेतली आहे. ते कॉलेज-स्तरीय टेबल टेनिस चॅम्पियन आणि लांब पल्ल्याचे धावपटू राहिले आहेत. क्रिकेट आणि व्हॉलीबॉलमध्येही त्यांना रस आहे. त्यामुळे राजकारणासोबतच त्यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी आणि वैविध्यपूर्ण आहे.

**सी.पी. राधाकृष्णन कोण आहेत?**

२० ऑक्टोबर १९५७ रोजी तामिळनाडूतील तिरुप्पूर येथे जन्मलेले सी.पी. राधाकृष्णन हे भाजपचे ज्येष्ठ नेते असून त्यांना चार दशकांहून अधिक काळाचा राजकीय अनुभव आहे. जुलै २०२४ पासून ते महाराष्ट्राचे २४ वे राज्यपाल म्हणून कार्यरत आहेत.त्याआधी फेब्रुवारी २०२३ ते जुलै २०२४ दरम्यान त्यांनी झारखंडचे राज्यपालपद भूषवले, तसेच काही काळ तेलंगणा आणि पुद्दुचेरीचा अतिरिक्त कार्यभार त्यांनी सांभाळला.

# शहापुरात आरोग्य कर्मचाऱ्यांचे थाळीनाद आंदोलन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : महाराष्ट्रातील आरोग्य सेवेतील कणा मानले जाणारे वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, औषधनिर्माता आणि आरोग्य सेविका हे कंत्राटी कर्मचारी गेल्या दहा वर्षांहून अधिक काळ सेवा बजावत आहेत. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत शासन निर्णयानुसार त्यांचे शासकीय सेवेत समायोजन करणे अपेक्षित असूनही सरकारने याकडे दुर्लक्ष केले आहे. यामुळे संतप्त झालेल्या राज्यातील तब्बल ३५ हजार कंत्राटी कर्मचाऱ्यांनी १९ ऑगस्टपासून बेमुदत आंदोलनाचा मार्ग अवलंबला आहे. या आंदोलनाचा भाग म्हणून ठाणे जिल्ह्यातील शहापूर येथे राष्ट्रीय आरोग्य अभियान एकत्रीकरण समितीच्या माध्यमातून कर्मचाऱ्यांनी थाळीनाद करून सरकारच्या वेळकाढू धोरणाचा तीव्र निषेध नोंदवला.

राज्यातील उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हारुग्णालय, जिल्हा रुग्णालय याठिकाणी राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, औषधनिर्माता, आरोग्यसेविका असे तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी रुग्णांची सेवा बजावत आहेत. तालुका, जिल्ह्यासह राज्यभरात सुमारे ३५ हजार कर्मचारी कंत्राटी तत्वावर कार्यरत असून औरंगाबाद खंडपीठाने दिलेला २० जून २०२२ चा व १४ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार दहा वर्षे व त्याहून अधिक काळ सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे शासकीय सेवेत समायोजन करणे अपेक्षित होते.

परंतू, १६ महिन्यांच्या कालावधी उलटून गेला



आहे तरीही सरकारने या कर्मचाऱ्यांना वाऱ्यावर सोडले आहे. 'आमच्या हातात सत्ता द्या, आम्ही तुम्हाला ऑर्डर देतो' असे डिसेंबर २०१२ ला तत्कालीन विरोधी पक्षनेते व विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आश्वासन दिले होते. परंतू, हे आश्वासन अद्याप सरकारने पूर्ण केले नसून आरोग्य सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली असल्याचा आरोप हे आरोग्य कर्मचारी करत आहेत.

या पार्श्वभूमीवर राज्यातील सुमारे ३५ हजार कंत्राटी कर्मचाऱ्यांनी १९ ऑगस्ट पासून बेमुदत आंदोलन सुरू केले आहे. यामुळे रुग्ण सेवेवर परिणाम झाला असून आबालवृद्ध रुग्णांची प्रचंड हेळसांड होत आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियान एकत्रीकरण समितीच्या माध्यमातून शहापुरच्या तालुक्यात देखील या आरोग्य कर्मचाऱ्यांनी थाळीनाद करीत सरकारच्या वेळकाढू धोरणाचा तीव्र निषेध नोंदवला आहे. गेल्या १५ दिवसांपासून सुरू असलेल्या या आंदोलनामुळे उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्रासह सरकारी रुग्णालयातील अतिदक्षता कक्ष, नवजात शिशु कक्ष, प्रसूती विभाग, लसीकरण, क्षयरोग, कुष्ठरोग, कर्करोग, मधुमेह या सेवांवर परिणाम झाला असून अत्यल्प कर्मचाऱ्यांमुळे रुग्णसेवेवरील ताण वाढला आहे. तसेच सर्वसामान्य रुग्णांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असून खासगी रुग्णालयाकडे धाव घ्यावी लागत आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ‘नमो शेतकरी योजने’चा सातवा हप्ता वितरित

**• राज्यातील ९१ लाख ६५ हजार १५६ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १८९२.६१ कोटी रुपये जमा**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : "शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी सुरू करण्यात आलेल्या ‘नमो शेतकरी महासन्मान किसान योजने’चा सातवा हप्ता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वितरित करण्यात आला. राज्यातील ९१ लाख ६५ हजार १५६ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात एकूण १८९२.६१ कोटी रुपये निधी शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग होईल.

मंत्रालय येथे ‘नमो शेतकरी महासन्मान निधी योजने’च्या अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना सातव्या हप्त्याचा निधी वितरित करण्यासाठी कृषी विभागातर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच कृषी मंत्री दत्तात्रय भरणे मंत्रीमंडळातील सदस्य, मुख्य सचिव राजेशकुमार उपस्थित होते.

केंद्र शासनाने सुरु केलेल्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या धर्तीवर राज्य शासनाने ही योजना सुरू केली. यामध्ये पात्र शेतकऱ्यांना थेट आर्थिक सहाय्य देऊन शेती खर्चाला हातभार लावण्याचा या योजनेचा उद्देश आहे. या सातव्या हप्त्यामध्ये एप्रिल २०२५ ते जुलै २०२५ या कालावधीचे अनुदान लाभार्थ्यांना देण्यात आले. ज्या शेतकरी लाभार्थ्यांचा प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत समावेश आहे. त्या सर्वांना राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा लाभ मिळाला आहे. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर हे अनुदान शेतक-यांसाठी महत्वाचे ठरणार आहे.

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना प्रतिवर्षी सहा हजार रुपये अनुदान देण्यात येते. केंद्र शासनाच्या या अनुदानामध्ये राज्य शासनातर्फे प्रति वर्षी आणखी सहा हजार रुपये अनुदान देण्यासाठी नमो शेतकरी महासन्मान निधी योजना राबविली जाते. या दोन्ही योजनेच्या माध्यमातून लाभार्थी शेतक-यांना प्रति वर्षी बारा हजार रुपये अनुदान मिळत असते. राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान योजनेअंतर्गत शेतकरी लाभार्थ्यांना आतापर्यंत एकूण सहा हप्ते देण्यात आले आहेत. आतापर्यंत सहा हप्त्यामध्ये ९३ लाख ९ हजार शेतकऱ्यांना ११ हजार १३० कोटी रूपयांचे वाटप करण्यात आले आहे.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, राज्यातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे, त्यांना उत्पादन खर्च भागवता यावा आणि शेती टिकाऊ व्हावी यासाठी ही योजना महत्त्वाची ठरत असून या योजनेद्वारे शेतकऱ्यांना प्रतिवर्षी आर्थिक मदत देण्यात येते. आतापर्यंतच्या सहा हप्त्यांमधून राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या खात्यात थेट मदत रक्कम जमा झाली आहे. सातवा हप्ता वितरित झाल्यानंतर या लाभार्थ्यांची संख्या आणखी वाढणार आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था बळकट होत असल्याचेही श्री. भरणे यांनी सांगितले.




# टिटवाळा : काळू नदीत कपडे धुण्यासाठी गेलेल्या दोन बहिणी बुडाल्या

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**एकीचा मृतदेह बाहेर काढला तर दुसरीचा शोध सुरु!**

कल्याण : प्रसिद्ध टिटवाळयाच्या महागणपती मंदिरा जवळ असलेल्या काळू नदित कपडे धुण्यासाठी गेलेल्या दोन बहिणी पाण्याचा अंदाज न आल्याने त्या बुडाल्या,यातील १८वर्षीय मुलीचा मृतदेह अग्निशमन दलाने बाहेर काढला असून दुसरीचा शोध सुरू आहे, या हद् यद्रावक घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

दोनच दिवसापूर्वी शहापूर तालुक्यातील आसनगाव जवळील मुंडेवाडी येथील३तरुण भारिंगे नदीत बुडाले होते. ही घटना ताजी असतानाच आज कपडे धुण्यासाठी नदीकाठी गेलेल्या दोन बहिणी पाण्याचा अंदाज न आल्याने बुडाल्या दोघी बहिणी मांडा पश्चिम वासुंदरी रोड परिसरात राहत होत्या ,दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनी पाण्यात शोध घेतला असता एका १८ वर्षाच्या मुलीचा मृतदेह बाहेर काढण्यात अग्निशमन दलाला यश आले. तिच्या ९ वर्षाच्या बहिणीचा शोध सुरू आहे,

दरम्यान, खडवली जवळील भातसा, म्हारळ, वरप, कांबा, रायते, आपटी येथील उल्हास तर दहागाव जवळील बारवी नदीत आतापर्यंत शेकडो लोकांचा बुडून बळी गेला आहे, त्यामुळे या परिसरात जीवरक्षक नेमावेत अशी मागणी करण्यात येत आहे.



# साखरचौथ गणेशोत्सव कायदा सुव्यवस्था राखूनच साजरा करा

## - डीवायएसपी जालिंदर नालकुल





दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण तालुक्यात १० सप्टेंबर रोजी साजरा होणारा साखरचौथ गणेशोत्सव सर्व मंडळानी आनंदात आणि उत्साहाने तसेच कायदा आणि सुव्यवस्था राखूनच साजरा करावा असे आवाहन पेण पोलिस उपविभागीय अधिकारी जालिंदर नालकुल यांनी सार्वजनिक गणपती मंडळांना केले आहे.

अनंत चतुर्थीच्या गणेश विसर्जनानंतर चार दिवसांनी येणाऱ्या साखरचौथ गणेशोत्सव पेण तालुक्यात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत असल्याने त्या अनुषंगाने पेण पोलीस ठाण्याच्या वतीने गणेश मंडळाच्या सदस्यांची बैठक आज आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला डीवायएसपी जालिंदर नालकुल, पोलीस निरीक्षक संदीप बागुल, उपनिरीक्षक विक्रम नवरखेडे, पोलीस कर्मचारी निलेश ठाकूर, मोरे आदिंसह मंडळातील कार्यकर्ते उपस्थित होते. तर यावेळी पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांनी सांगितले की साखरचौथीचे गणपती विसर्जनासाठी मंडळातील सदस्यांनी लवकर काढावेत कोणताही अडथळा येणार नाही याची काळजी घ्यावी, विसर्जनाकरीता स्पिकर परवाना घ्यावा तसेच डीजे, लेझर लाईट यांचा वापर करू नये यासह दहा वाजता स्पिकर बंद करण्यात यावे असे सांगून आपल्यासाठी पोलीस सदैव तत्पर आहेत. आपण गणेशोत्सव साजरा करत असताना तो आनंदाने साजरा करावा कायद्याचे कोणीही उल्लंघन करू नये अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल. यावेळी उपस्थित मंडळातील सदस्यांनी स्पिकर परवान्यासाठी आपले कागदपत्रे पोलीस ठाण्यात दाखल केले.

# समर्थ कॉम्प्लेक्समधील रहिवाशांचा आत्मदहनाचा इशारा




## डोंबिवलीतील ६५ बेकायदा इमारत प्रकरण शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा कारवाईला तीव्र विरोध

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डोंबिवलीतील 65 बेकायदा इमारतींवर सुरू असलेल्या कारवाईमुळे आयरे गाव परिसरातील समर्थ कॉम्प्लेक्स या इमारतीतील शेकडो गोरगरीब रहिवासी प्रचंड अस्वस्थ झाले आहेत. महापालिकेच्या कारवाईला तीव्र विरोध करत महिला पुरुष रहिवाशांनी हातात फलक आणि पेट्रोलच्या बाटल्या घेऊन 'आमच्या घरावर कारवाई झाली तर आम्ही स्वतःला पेट्रोल ओतून स्वतःला जाळून घेऊ', असा थेट इशारा दिला. यामुळे परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. आयरे गावातील समर्थ कॉम्प्लेक्सवरील कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली असून, पुढील निर्णयासाठी नगरविकास विभागाने मुंबईत एक बैठक बोलावली आहे. दरम्यान, कारवाईच्या भीतीमुळे रहिवासी रस्त्यावर उतरून आंदोलन करत आहेत. महिलांसह पुरुषही संतप्त झाले असून, 'आम्ही गरीब आहोत, बँकेकडून कर्ज काढून घरे घेतली, तरी आम्हाला बेघर कसे करणार?', असा सवाल त्यांनी केला.

याबाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांनी या कारवाईला तीव्र विरोध दर्शवला. आम्ही ही कारवाई होऊ देणार नाही, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. कोर्टाने मल्हार अपार्टमेंटवर कारवाईचे आदेश दिले असताना, त्याऐवजी समर्थ कॉम्प्लेक्सवर कारवाई केली जात असल्याने कोणाला वाचवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. पुढे या इमारतीवरील कारवाई झाली, तर आम्ही उग्र आंदोलन छेडू, असा इशारा दिला.

याबाबत समर्थ कॉम्प्लेक्स मधील रहिवाशांनी प्रसारमाध्यमांसमोर आपली व्यथा मांडली. "आम्ही बँकेकडून कर्ज काढून घरे घेतली. महारेराकडून ही इमारत कायदेशीर असल्याचे दाखवून विकली गेली. मग आम्ही काय चूक केली? सरकारने आम्हाला बेघर होऊ देणार नाही, असे आश्वासन दिले होते, तरी कारवाई कशी केली जात आहे?", अशी संतप्त प्रतिक्रिया त्यांनी दिली.

डोंबिवलीतील 65 इमारतींतील घरांची विक्री पूर्ण झाल्यानंतरच त्या इमारती अनधिकृत असल्याचे समोर आले. तोपर्यंत अनेक कुटुंबे वास्तव्यास आली होती. बनावट कागदपत्रांच्या आधारे ही इमारती उभारल्याचा आरोप असून, कल्याण डोंबिवली महापालिकेने रहिवाशांना घरे रिकामी करण्याच्या नोटिसा पाठवल्या होत्या. त्याविरोधात काही रहिवाशांनी उच्च न्यायालयात दाद मागितली होती. सध्या तरी कारवाई कल्याण डोंबिवली महापालिकेकडून स्थगित करण्यात आल्याने रहिवाशांना दिलासा मिळाला असला तरी, नगरविकास विभागाच्या बैठकीत काय तोडगा निघतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# उत्तरप्रदेशच्या तीन सराईत चोरांना अटक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : पादचारी वृध्द महिलांना रस्त्यात एकटे गाठून त्यांच्या गळ्यातील सोन्याचा ऐवज लुटून पलायन करणाऱ्या उत्तरप्रदेशातील तीन सराईत चोरट्यांना डोंबिवली रामनगर पोलीस ठाण्याच्या विशेष पथकाने अटक केली आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या या चोरट्यांकडून एक रिव्हॉल्व्हर, चार जिवंत काडतुसे आणि तीन लाख ८० हजार रूपयांचा सोन्याचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

अभय सुनील गुप्ता (२१, कुमारनटोला, गोकर्णनाथ, उत्तरप्रदेश), अभिषेक ओमप्रकाश जौहरी (३२, रा. कोतवाली, फतेपूर, उत्तरप्रदेश), अर्पित उर्फ प्रशांत शुक्ला (२७, रा. खमरिया, लखीमपुरा, उत्तरप्रदेश) अशी अटक चोरांची नावे आहेत. गेल्या महिन्यापासून डोंबिवलीत पादचारी वृध्द, ज्येष्ठ नागरिक महिलांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र, सोनसाखळी लुटण्याच्या घटना वाढल्या होत्या. गेल्या आठवड्यात ठाकुर्ली ९० फुटी रस्ता भागात कांचनगाव येथे चामुंडा गार्डन सोसायटीत राहणाऱ्या थंकमणी नायर (६५) संध्याकाळच्या वेळेत दुकानातून सामान घेऊन घरी पायी चालल्या होत्या. त्या सोसायटीच्या प्रवेशद्वारात जाताच दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील एक लाखाहून अधिक रकमेची सोन्याची साखळी चोरून नेली होती.

पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी या चोरट्यांना अटक करण्यासाठी सहाय्यक पोलीस आयुक्त सुहास हेमाडे, रामनगरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश जवादवाड यांना निर्देशीत केले होते. उपायुक्त झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अच्युयत मुपडे, उपनिरीक्षक प्रसाद चव्हाण यांचे विशेष शोध पथक तयार करण्यात आले होते.

या पथकाने नायर यांच्या गळ्यातील सोन्याचा ऐवज लुटला त्या ठिकाणापासून ते परिसरातील १०६ सीसीटीव्ही कॅमेरे तपासले. त्यात एमएच २० एफआर १८५१ क्रमांकाच्या दुचाकीवरून चोरटे चोऱ्या करत असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी दुचाकी मालकाचा शोध घेतला. त्याने आपली दुचाकी नारायण पेठ पुणे येथून गेल्या महिन्यात चोरीला गेली आहे, असे सांगितले.

तपास सुरू असताना आरोपी डोंबिवली पूर्वेतील सुनीलनगर भागात येणार आहेत अशी गुप्त माहिती उपनिरीक्षक चव्हाण यांना मिळाली. पथकाने त्या भागात सापळा लावून तीन इसमांना ताब्यात घेतले. या तिन्ही इसमांनी आपण डोंबिवली, मानपाडा पोलीस ठाणे हद्दीत सोनसाखळी चोरीचे गुन्हे केल्याची कबुली पोलिसांना दिली.

त्यांच्याकडून चोरीचा तीन लाख ८० हजाराचा ऐवज पोलिसांनी जप्त केला. सोन्याची चार ग्रॅम वजनाची लगड, २४ ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र जप्त केले आहे. अर्पित शुक्लावर उत्तरप्रदेशात खुनाचा गुन्हा दाखल आहे. हे तिन्ही आरोपी पोलीस कोठीडत आहेत, असे उपायुक्त अतुल झेंडे यांनी सांगितले.

या गुंडांवर पुणे येथील विश्रामबाग, हारगाव, बिबेवाडी, हडपसर, कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. डोंबिवलीत रामनगर, मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. या कारवाईत विक्रम गौड, राजेंद्र खेडकर, अच्युत मुपडे, प्रसाद चव्हाण हे पोलीस अधिकारी आणि हवालदार सुनील भणगे, मंगेश शिर्के, देविदास पोटे, ज्ञानेश्वर शिंदे, नितीन सांगळे, राजेंद्र सोनावणे, प्रशांत सरनाईक, शिवाजी राठोड सहभागी झाले होते.

# अनभिषिक्त स्वर माऊली

13 व्या वर्षांपासून सुरू झालेला स्वर प्रवास आजही कष्टमय जीवन प्रवासा सोबत सातत्याने करताना वयाची 92 वर्षे पूर्ण होत असताना देखिल तितक्याच उमेदीने आणि उत्साहाने सुरूच आहे,जय शारदे वागीश्वरी हे गीत गाऊन जणू काही स्वतः साठीच सिद्ध झालंय असे म्हटले तर वावगे ठरणार नाही इतकी एकरूपता, अन एकतानता अगदी भारावून जाईल अशी सुंदर सुरावट उपमा देण्यास शब्दच थिटे पडावेत असे खळखळूनi वाहणाऱ्या पाण्याप्रमाणे नितळ पारदर्शक गाणे नितळ अन निखळ अवखळ पार तळाशी जाऊन मोती हातात घेऊन यावे इतके स्वच्छ अन स्पष्ट दैवीदेणं सुरांचे लेणं, लाभलेली, स्वरगिय गंधर्व कन्या भुवरी येवून चोखंदळ रसिक कानसेन यांना गेले,8दशके आपल्या दैवी सुरांनी गाणं गावून आजही या वयात, सुरांच्या सतत बरसण्याने चिंब भिजवत आहेत, हे खरंच मानवी मनास पडलेले न सोडवता येणारे गहन कोडे जाणवते.

जन्मोजन्मीचे संगीत जन्मजात उपजत घेऊन या जन्मी सर्वसामान्य रसिक यांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य घटक होऊन त्यांच्या मनावर, हृदयावर सुरांचा वर्षाव करून जीवन जगणे सुसह्य केले आहे.

असा एकही संगीतकार नाही की त्यांचे गाणे आशा ताईंनी गायले नाही अगदी जुन्या जमान्या पासून ते अगदी अलीकडील नवखे संगीतकार यांनी त्यांच्या दैवी सुरांचा, अचूक, उचित उपयोग करून गीतास परिस स्पर्शाने सोने अन श्रवणीय केले आहे.रसिक जणांच्या मनावर कायमच अधिराज्य करत,साजेसे दिमाखात विराजमान होऊन जागतिक विक्रमच केला आहे.

अथक परिश्रम घेऊन जीवनातल्या प्रत्येक समस्यांना सामोरे जाऊन, मेहनतीने आपल्या सदाबहार आवाजाने गाण्यांनी रसिकांना मनसोक्त श्रवण तृप्त करत विविध प्रकारच्या गाण्यातून गाऊन या जन्मातच जीवन सार्थकी लावून अजूनही रसिकांना जादुई आवाजाने चिंब भिजवणारी ऊर्जा स्रोत कायमस्वरूपी मनाला भुरळ घालणाऱ्या ,संगीतरुपी दैवताची पुजारी संगीत सारितेला आज जन्मदिनी अभिष्टचिंतन ,मनपूर्वक अभिवादन अन लाख लाख हार्दिक शुभेच्छा.

आशाताई तुम जियो हजारो साल,
सालके दिन हो पच्यास हजार

**सौं,मीना घोडविंदे, वनगे**
**रसिक संगीत प्रेमी**

# शेतकऱ्यांच्या रस्त्यांना मिळणार विशिष्ट क्रमांक

## नकाशावर नोंदणी सुरु

### शेतकऱ्यांसाठी ऐतिहासिक निर्णय

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ओतूर : राज्य सरकारने ग्रामीण भागातील शेत, शिव व पाणंद रस्त्यांचे वर्गीकरण करून त्यांना विशिष्ट क्रमांक देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यामुळे गावनिहाय सर्व रस्त्यांची दप्तरी नोंद होणार असून शेतकऱ्यांच्या वहिवाटीसाठी ही मोठी मदत ठरणार आहे, अशी माहिती जुन्नरचे तहसीलदार डॉ. सुनील शेळके यांनी दिली. महसूल विभाग व वनविभाग यांच्या समन्वयाने तसेच पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका समितीची बैठक तहसीलदार डॉ. शेळके यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. बैठकीस उपविभागीय अधिकारी, उपअधिक्षक भूमी अभिलेख, पंचायत समितीचे प्रतिनिधी आणि ग्राम महसूल अधिकारी उपस्थित होते. या अंतर्गत जुन्नर तालुक्यातील १८५ गावांचे नकाशे संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले असून, पुढील आठ दिवसांत ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच, पोलीस पाटील आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या समन्वयाने शिवार फेरी काढून गावातील सर्व वहिवाटीचे रस्ते नोंदवले जाणार आहेत. नकाशावर असलेले व नसलेले रस्ते प्रपत्र १ आणि प्रपत्र २ मध्ये नोंद घेऊन त्यात संबंधित शेतकऱ्यांची संख्या, रस्त्याची लांबी आणि गट क्रमांक यांची माहिती समाविष्ट केली जाणार आहे. ही माहिती ग्रामसभेत मांडून मान्यता घेण्यात येणार असून अतिक्रमित किंवा बंद रस्त्यांवर विशेष सुनावणी घेऊन निर्णय घेतला जाईल. मान्यता मिळाल्यानंतर सर्व रस्त्यांना भू-सांकेतिक (GIS) क्रमांक देऊन नकाशावर त्याची नोंद केली जाईल. यामुळे ग्रामीण भागातील शेतरस्त्यांना कायदेशीर मान्यता मिळणार आहे. तहसीलदार डॉ. शेळके यांनी ग्रामस्थांना शिवार फेरीत सहभागी होण्याचे आणि प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे शेतकऱ्यांचे रस्त्याशी संबंधित अनेक प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

# गाणं कडकडीत.. प्रेम झणझणीत.!

## 'वडापाव' चित्रपटाचं टायटल ट्रॅक प्रेक्षकांच्या भेटीला




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : "प्रेमात पडायचं तर कडकडीतच आणि प्रेमात पाडायचं तर झणझणीतच... वडापावसारखंच!", या भन्नाट ओळींसह 'वडापाव' चित्रपटाचं टायटल ट्रॅक प्रदर्शित झालं असून प्रेक्षकांच्या मनाला झणझणीत चव देत आहे. मुंबईचा जीव असलेला वडापाव जसा सर्वांचा लाडका आहे, तसाच हे गाणंही प्रेक्षकांना तुफान आवडत आहे.

गाण्याचं आकर्षण म्हणजे कुणाल–करण यांचे भन्नाट शब्द आणि मस्त बिट्स, नकाश अझीझ यांचा दमदार आवाज. यामुळे या गाण्याची रंगतदार रेसिपी तयार झाली असून ती प्रेक्षकांना चविष्ट अनुभव देते.

दिग्दर्शक प्रसाद ओक म्हणाले, "आमचं लक्ष्य फक्त गाणं बनवणं नव्हतं, तर मुंबईचा आत्मा टिपायचा होता. हे टायटल ट्रॅक प्रत्येकाला नाचवणार, यात अजिबात शंका नाही."

संगीतकार, गीतकार कुणाल - करण म्हणाले, "हे गाणं लिहिताना आणि संगीत ठरवताना आमच्या डोक्यात एकच विचार होता, वडापाव जसा साधा असूनही झणझणीत आहे, तसंच हे गाणं असावं. शब्द साधे, तरीही थेट मनाला भिडणारे आणि संगीत असं की, ऐकताच पाय आपोआप थिरकायला लागतील. हे टायटल ट्रॅक म्हणजे फक्त गाणं नाही, तर मुंबईतील प्रत्येकाचा जिव्हाळ्याचा विषय आहे."

२ ऑक्टोबरला प्रदर्शित होणारा 'वडापाव' हा पूर्णपणे कौटुंबिक चित्रपट आहे. गोड नात्यांची चवदार गोष्ट यात पाहायला मिळणार असून, टायटल ट्रॅकने प्रेक्षकांची उत्सुकता आणखी वाढवली आहे. या चित्रपटात प्रसाद ओक, अभिनय बेर्डे, गौरी नलावडे, रसिका वेंगुर्लेकर, शाल्व किंजवडेकर, रितिका श्रोत्री, समीर शिरवाडकर, सिद्धार्थ साळवी, अश्विनी देवळे-किन्हीकर आणि सविता प्रभुणे यांच्या भूमिका आहेत.

एबी इंटरनॅशनल फिल्म्स एलएलपी, मर्ज एक्सआर स्टुडिओ, व्हिक्टर मुव्हीज लिमिटेड, अमेय विनोद खोपकर एंटरटेनमेंट आणि मोहसीन खान प्रस्तुत, सिनेमॅटिक किडा बॅनरअंतर्गत हा चित्रपट निर्मित झाला आहे. निर्माते अमित बस्नेत, प्रजय कामत, स्वाती खोपकर आणि निनाद नंदकुमार बत्तीन असून सहनिर्माते तबरेझ एम. पटेल आणि सानीस खाकुरेल आहेत. छायाचित्रण दिग्दर्शक संजय मेमाणे तर लेखन सिद्धार्थ साळवी यांनी केलं आहे.

# ठाणे जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयात राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीनिवास अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार, दि.13 सप्टेंबर 2025 रोजी 'राष्ट्रीय लोकअदालत' चे आयोजन करण्यात आले आहे. न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेली प्रकरणे आणि दाखल पूर्व प्रकरणे सुनावणीसाठी लोक अदालतीमध्ये ठेवता येतील. संबंधितांनी ठाणे जिल्ह्यातील ठाणे जिल्हा न्यायालय व सर्व तालुक्यातील न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी व राष्ट्रीय लोकअदालतीचा लाभ घेण्यासाठी येत्या शनिवार, दि.13 सप्टेंबर, 2025 रोजी आयोजित केलेल्या लोकअदालतीमध्ये आपली प्रकरणे ठेवावीत, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव न्या. रविंद्र पाजणकर यांनी केले आहे.

लोक अदालतच्या निवाडयाविरुध्द अपील नाही, एकाच निर्णयात कोर्टबाजीतून कायमची सुटका होते, खटल्यांमध्ये साक्षी पुरावा, उलटतपासणी, दिर्घ युक्तीवाद या बाबी टाळल्या जातात. निकाल झटपट लागतो. लोक अदालतीत होणारा निवाडा हा आपआपसात समजुतीने होत असल्याने कुणाची हार वा जीत होत नाही. लोक अदालतीचा निवाडा दोन्ही पक्षांना समाधान देतो, परस्पर संमतीने निकाल होत असल्याने एकमेकांतील द्वेष वाढत नाही व कटुताही निर्माण होत नाही. कोर्टाच्या हुकूमनाम्याप्रमाणे लोकअदालतीत होणाऱ्या निवाड्याची अंमलबजावणी कोर्टामार्फत करता येते, वेळ पैसा यांची बचत होते, इतकेच नव्हे तर लोक अदालतीत निकाली निघणाऱ्या प्रकरणांमध्ये कायद्यानुसार कोर्ट फिची रक्कम परत मिळते. लोकअदालतचे महत्व लक्षात आल्याने यापूर्वी झालेल्या राष्ट्रीय लोकअदालत मध्ये ठाणे जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून राष्ट्रीय लोकअदालतचा फायदा पक्षकारांना मिळाला आहे.

### मागील 2 लोकअदालत मध्ये विक्रमी प्रकरणे निकाली काढण्यात यश

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे मार्फत ठाणे आणि पालघर जिल्ह्यातील (माहे 22 मार्च 2025 आणि 10 मे, 2025 मध्ये एकूण 60392 न्यायालयीन प्रलंबित आणि 139662 दावा दाखल पूर्व प्रकरणे) लोकअदालतीमध्ये निकाली काढण्यात आली. कोट्यावधी रुपयांची नुकसानभरपाईची रक्कम संबंधितांना मिळाली आहे.

### वाहन चलनाच्या प्रकरणांसाठी स्वतंत्र पॅनल

वाहनांची वाढती संख्या व वाहन चालकांकडून वाहन कायदा तरतुदीचे उल्लंघन वाढत असून त्याविषयीची तडजोडपात्र लाखो प्रकरणे दाखल होतात. तरी, अशा प्रकरणांची दखल जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने घेतली असून त्यासाठी स्वतंत्र पॅनलची व्यवस्था केली आहे. तरी, ज्यांची वाहन चलनाची प्रकरणे आहेत त्यांनी त्वरीत संबंधीत वाहन शाखेशी संपर्क साधावा, असे अवाहन करण्यात आले आहे.

दाखल पूर्व ही प्रकरणे ठेवता येतील

जिल्हा न्यायालय, तालुका न्यायालयांमध्ये 13 सप्टेंबर, 2025 रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये धनादेश अनादर प्रकरणे, बँकेचे कर्ज वसूली प्रकरणे, कामगारांचे वाद, कर वसुलीचे प्रकरणे, विद्युत आणि पाणी देयक बद्दलची प्रकरणे आणि इतर आपसात तडजोड पात्र प्रकरणे, वैवाहिक व इतर दिवाणी वाद, दाखल पूर्व ही प्रकरणे ठेवता येतील.

### न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे ठेवता येतील

आपआपसात तडजोड करण्याजोगे फौजदारी प्रकरणे, मोटार अपघात नुकसान भरपाई प्रकरणे, वैवाहिक वाद, कामगारांचे वाद, भूसंपादन प्रकरणे, विद्युत आणि पाणी देयक बद्दलचे प्रकरणे, सेवा विषयक पगार, भत्ते व सेवा निवृत्तीचे फायदे-विषयक प्रकरणे, महसूल प्रकरणे, इतर दिवाणी प्रकरणे जसे भाडे, वहिवाटीचे हक्क, मनाई हुकमाचे दावे, विशिष्ट पूर्व बंध कराराची पूर्तता विशयक वाद आदी न्यायालयात प्रलंबित प्रकरणे लोकअदालतीमध्ये ठेवता येतील. तरी आपली प्रलंबित तसेच दाखल व्हावयाचे आहेत अशी प्रकरणे दि.13 सप्टेंबर 2025 रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये सुनावणीसाठी ठेवण्याकरिता संबंधित न्यायालयातील तालुका विधी सेवा समिती अथवा जिल्हा विधी सेवा समिती प्राधिकरण यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा आणि लोक अदालतीमध्ये सहभागी होऊन आपले वाद सामोपचाराने कायमचे मिटवावेत, असे आवाहन ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सचिव न्या. रविंद्र श्रीराम पाजणकर यांनी केले आहे.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in



जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

## आजचे राशि भविष्य



**मेष**

व्यक्तिमत्वात आणि स्वभावात झालेला बदल उत्कृष्ट असेल. सामाजिक आणि कौटुंबिक सदस्यांकडूनही तुम्हाला विशेष सन्मान मिळेल.

**वृषभ**

आज तुम्हाला हे लक्षात ठेवावे लागेल की एखाद्या व्यावसायिकाशी भांडण सारखे प्रसंग उद्भवू शकतात. यामध्ये तुमच्या रागावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.

**मिथुन**

तुमच्याबद्दलची कोणतीही खास गोष्ट कोणाशीही शेअर करू नका. अति स्वकेंद्रित असण्याने आणि अहंकाराची भावना असल्यामुळे संबंधांमध्ये तणाव निर्माण होतो.

**कर्क**

ध्येय निश्चित करण्यासाठी नवीन योजना कराल, ही योजना भविष्यात प्रभावी ठरेल. आरोग्याशी संबंधित किरकोळ समस्यांमुळे आळस हावी राहील.

**सिंह**

घरात काही महत्त्वाच्या व्यक्तीच्या आगमनामुळे एखाद्या विषयावर सकारात्मक चर्चा होईल.व्यावसायिक कामकाजात सुधारणा होण्याची अपेक्षा करू नका.

**कन्या**

दिवसआनंदाने भरलेला दिवस सुरू होणार आहे. कौटुंबिक बाबींमध्ये थोडी घाई करावी लागेल. तुमच्या योगदानामुळे आदर आणि सन्मान देखील वाढेल.

**तूळ**

तुमच्या व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल होईल आणि तुमच्या जीवनशैलीबद्दल अधिक जागरूक राहणे इतरांच्या आकर्षणाचे केंद्र बनेल.

**वृश्चिक**

विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षकांचे पूर्ण सहकार्य मिळेल. आज तुम्ही तुमची लपलेली प्रतिभा ओळखून सर्जनशील कार्यात त्याचा वापर कराल.मानसिक बळ मिळेल.

**धनु**

प्रलंबित देयके गोळा करण्यासाठी आणि आर्थिक परिस्थिती मजबूत करण्यासाठी ही वेळ चांगली आहे. सर्व मेहनत आणि शक्ती तुमच्या कामात वाहून घ्याल.

**मकर**

तुमची वैयक्तिक कामेही आज बऱ्याच प्रमाणात सुरळीतपणे पूर्ण होतील.अज्ञात व्यक्तीशी जास्त संवाद साधल्याने तुमचे नुकसान होऊ शकते.

**कुंभ**

कोणतेही प्रलंबित काम पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस योग्य आहे. कोणतीही योजना राबवण्यापूर्वी कुटुंबातील सदस्यांचा सल्ला अवश्य घ्या.

**मीन**

काम करण्यापूर्वी त्याच्याशी संबंधित माहिती घेतल्यास अधिक यश मिळेल. प्रतिभा ओळखाल आणि दिनचर्या आणि कामाचा क्रम पूर्ण उर्जेने सांभाळाल.

नियमित वाचा दैं. ठाणे जीवनदीप वार्ता

# कल्याणमध्ये नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे २३ हजार किलो निर्माल्य संकलन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे व महाराष्ट्र भूषण पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि डॉ. सचिन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली निर्माल्याचे संकलन आणि त्यातून खत निर्मितीचे महत्वपूर्ण कार्य दीड दिवस, सात दिवस व दहा दिवसाच्या गणपती विसर्जनामध्ये कल्याणमधील नांदिवली, गणेश घाट- दुर्गाडी, नवीन गणेश घाट- कोनगाव, गौरीपाडा तलाव, म्हारळ सोसायटी रिजेन्सी, टिटवाळा या ठिकाणी हे कार्य करण्यात आले. जेथे 800 हून अधिक सदस्यांच्या मार्फत 23 हजार किलो निर्माल्य गोळा करण्यात आले व यासोबत अनेक ठिकाणी गणेश विसर्जन स्थळावर हे कार्य करण्यात आले.

विसर्जनासाठी आलेल्या गणेश मूर्तीसोबत असलेल्या निर्माल्याचे या ठिकाणी संकलन केले गेले. प्रतिष्ठानच्या श्री सदस्यांनी या संकलन केलेल्या निर्माल्यामधून धागे, दोरे, प्लास्टिक, कागद आणि इतर अनावश्यक वस्तू बाजूला करण्याचे काम केले. त्या निर्माल्यातून फक्त फुले वेगळी करून त्यांच्या पाकळया वेगळ्या करून त्या गोण्यात जमा करण्यात आले. जमा झालेल्या पाकळ्यांपासून गांडूळखत तयार केले जाते. हे तयार झालेले खात प्रतिष्ठानमार्फत लावण्यात आलेल्या झाडांना पुरवले जाते.

तसेच महाराष्ट्र भूषण पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि डॉ. सचिन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक समाजउपयोगी कार्य करत आहे. बैठकीच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलन, बालसंस्कार मार्गदर्शन, जल पुनर्भरण,. स्वच्छता अभियान आणि विहीर व तलावांची स्वच्छता, आरोग्य शिबीर, रक्त दान शिबीर यांचा समावेश आहे. या प्रतिष्ठानचे कार्य फक्त भारतातच नाही, तर अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, सिंगापूर, नॉर्वे, दुबई आणि कतारसारख्या अनेक देशांमध्ये सुरु आहे.


## कल्याण डोंबिवली महानगरपालिका
## नगर रचना विभाग

### जाहिर सुचना

ज्याअर्थी कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील सेक्टर क्र. १ मधील मौजे-कल्याण (प.) विभागातील रामबाग लेन नं.४ गुरुव्दारा ते आदर्श हिंदी हायस्कुल पर्यंत (नकाशात दर्शविल्याप्रमाणे A to B) मंजुर विकास योजनेतील रस्ता नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० अन्वये रस्ता विकसीत करण्याचा महापालिकेचा मानस आहे.

ज्याअर्थी, सर्वेक्षण नकाशाच्या प्रतीवर वरील नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे सदर अस्तित्वातील रस्ता सरासरी ४.०० ते ४.५० मी. रुंदीचा साधारण ६४.०० मी. लांबीचा विद्यमान रस्ता उपलब्ध असुन सदर परिसरातील पुनर्विकास तसेच त्याप्रमाणे वाढणारी रहदारी व वाहतूक नियोजनाच्या दृष्टीने तसेच आरोग्य सेवा इत्यादी बाबींचा विचार करून जनहिताच्या दृष्टीने उक्त रस्ता (नकाशात दर्शविल्याप्रमाणे A to B ) ६.०० मी. रुंद करण्याचा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचा मानस आहे. सदरच्या रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या रूपरेषा मा. आयुक्त महोदय यांच्या दि. २६/०८/२०२५ रोजीच्या मान्यतेने विहीत करण्यात आली आहे.

त्याअर्थी, या जाहिर सुचनेव्दारे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० मधील तरतुदीनुसार सदर परीसरातील तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील सर्व नागरीकांना या जाहिर सुचनेव्दारे कळविण्यात येते की, उक्त रस्ता ६.०० मी. रुंद करुन त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या रेषा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या नगररचना विभागात उपलब्ध असलेल्या नकाशाप्रमाणे विहित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० प्रमाणे कोणीही वरील प्रमाणे विहित केलेल्या सदर रस्त्याच्या रेषेत कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू शकणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

१) नोटीस प्रसिध्द झालेल्या दिनांका पासुन एक महिन्याच्या मुदतीत आपल्या सुचना व हरकती असल्यास मा. प्रशासक तथा आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका द्वारा सचिव, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांचेकडे लेखी स्वरूपात द्याव्यात.

२) सदर नोटीस व नकाशाची प्रत नागरिकांच्या माहितीसाठी नगररचना विभाग मुख्यालय नोटीस बोर्डवर व "२/ब प्रभाग क्षेत्र" कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आली आहे.

सही /-
(सं. ना. डोईफोडे)
सहाय्यक संचालक नगररचना कल्याण
डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

जा.क्र कडोंमपा/जसंवि/मुका/४७७
दि.०९/०९/२०२५


# उत्कृष्ट ग्रंथालय कर्मचारी व सेवक (ग्रंथ मित्र) पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाअंतर्गत ग्रंथालय संचालनालयाकडून राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व्हावा, ग्रंथालयांकडून जनतेला अधिक चांगल्या ग्रंथालयीन सेवा उपलब्ध करून द्याव्यात, वाचन संस्कृती वृद्धिगत करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार तसेच ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवक यांना भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.शियाली रामामृत रंगनाथन यांच्या नावाने डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक (ग्रंथमित्र ) पुरस्कार देण्यात येतात.राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील अ, ब, क, ड वर्गातील उत्कृष्ट शासनाच्या सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे एक लाख, 75 हजार, 50 हजार, 25 हजार रोख रक्कम, सन्मानचिन्हे, प्रमाणपत्र आणि ग्रंथ भेट देऊन गौरविण्यात येते.

राज्यातील एक राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व एक राज्यस्तरी उत्कृष्ट ग्रंथालय सेवक यांना प्रत्येकी 50 हजार तसेच राज्यातील प्रत्येक महसुली विभागातील प्रत्येकी एक उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व उत्कृष्ट ग्रंथालय सेवक यांना प्रत्येकी 25 हजार रोख रक्कम, सन्मानचिन्हे, प्रमाणपत्र आणि ग्रंथ भेट देऊन गौरविण्यात येते.

सन २०२४-२५ या वर्षाच्या पुरस्कारासाठी इच्छुक असणारी ग्रंथालये, कार्यकर्ते व सेवक (ग्रंथमित्र ) यांनी आपले विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक 30 सप्टेंबर 2025 पर्यंत तीन प्रतीत आपल्या जिल्ह्यातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयाकडे पाठवावेत असे आवाहन ग्रंथालय संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबईचे प्र. ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी केले आहे.

# वागळे इस्टेट परिसरात ईद उत्सव साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : मोहम्मद पैगंबर यांच्या जन्मदिनानिमित्त वागळे इस्टेट, इंदिरानगर येथे सालाबादप्रमाणे याहीवर्षी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली जामा बदर मस्जिद, मदरसा कादरिया, दर्गा ट्रस्ट, दादू भाई प्रतिष्ठा यांच्या संयुक्त विद्यमाने जश्ने ईद-ए-मिलादुन्न नबी मुबारक उत्सवाचे आयोजन करण्यात आले. यावेळी परिसरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत हजारो नागरिकांनी उस्फूर्त सहभाग घेतला होता. पैगंबर मोहम्मद यांच्या जीवनातील आदर्श, शिकवण व मानवतेचा संदेश यांचा आढावा घेण्यात आला. यावेळी जामा बदर मस्जिदचे अध्यक्ष असहद हुसेन बरकाती, सचिव व मशीदचे इमाम हाजी सगीर अहमद बरकाती आणि खजिनदार अजगरअली सुभानी, शिवसेनेचे सचिव राम रेपाळे, मनोज शिंदे, रविंद्र मोरे, माजी नगरसेवक दिलीप बारटके, माजी नगरसेवक एकनाथ भोईर, विकास रेपाळे, दशरथ यादव, महेंद्र सोडारी, राम एंकुरे, बाळाजी सांळुके, पवन पडवळ, अफराक सिद्दीकी, फिरोज शेख, नदीम खान, आमिर अन्सारी, सिराज अंसारी, जमील खान, दिलावर खान, सिकंदर खान, सद्दाम खान, इद्रिस शेख, बबलू शेख अन्सार, इजार खान, नुरूल शेख, कदीर शेख, इब्राहिम खान, मेहबूब शेख, मिराज शेख, असलम खान, विकी विश्वकर्मा, युवा सेनेचे साईद अन्सारी, गौतम पारखे, भास्कर तिवारी तसेच प्रतिष्ठानचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व मान्यवर उपस्थित होते.

दादू भाई प्रतिष्ठानच्या वतीने नियाज वाटप तसेच लहान मुलांना भेटवस्तू देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या माध्यमातून बंधुता, ऐक्य, शांतता व सौहार्द यांचा संदेश समाजामध्ये पसरविण्यात आला. स्थानिक नागरिकांच्या सहभागामुळे कार्यक्रमाला उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला. सदर कार्यक्रम धार्मिक वातावरणात पार पडला. दादूभाई प्रतिष्ठानचे अध्यक्ष बबलू दादुभाई शेख यांनी मान्यवरांचे आभार मानले.

# रमेश खारे यांच्या सेवापुर्ती सोहळ्याला नातेवाईकांचा जल्लोष



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड सार्वजनिक बांधकाम विभागात चौकीदार म्हणून काम करणारे रमेश परसू खारे हे नियत वयोमानानुसार 32 वर्षे नोकरी करून 30 ऑगस्ट 2025 रोजी सेवानिवृत्त झाले.गौरी गणपतीचा सण असल्याने त्यांनी सेवानिवृत्तीचा कार्यक्रम ठेवला नव्हता परंतु आज दि.9 सप्टेंबर 2025 रोजी शासकीय विश्रामगृह मुरबाड येथे त्यांच्या सेवापुर्तीचा सोहळा संपन्न झाला.

आपल्या मुरबाड मधील शिवनेरी शासकीय विश्राम गृहात चौकीदार म्हणून काम करताना त्यांनी येथे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला खूप चांगल्या प्रकारे सेवा देण्याचा प्रयत्न केला व सहकार्य केले.साधी राहणी व प्रेमळ स्वभावाने त्यांनी अनेकांची मने जिंकली होती.म्हणून त्यांच्या आजच्या सेवापुर्तीच्या कार्यक्रमाला त्यांचा मित्र परिवार, नातेवाईक, तालुक्यातील पत्रकार बांधव, ग्रामस्थ,बांधकाम विभागातील अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांना सेवापुर्तीच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी शासकीय विश्रामगृह ते त्यांचे निवासस्थान असलेल्या तोंडलीकरनगर येथ पर्यंत वाजत गाजत फटाक्यांची आतषबाजी करत मिरवणूक काढण्यात आली होती.या मिरवणूकीत त्यांच्या नातेवाईकांनी,ग्रामस्थांनी डी.जे तालावर ठेका धरत जल्लोष केला.

# अनुदानित आश्रमशाळा कर्मचारी पतसंस्थेची निवडणूक बिनविरोध

दै.ठाणे जीवनदीप वार्ता





ओतूर : घोडेगाव ता. आंबेगाव येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालया अंतर्गत असलेल्या अनुदानित आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांच्या 'अनुदानित आश्रमशाळा सेवक सहकारी पतसंस्था मर्या. नारायणगाव ता. जुन्नर जि. पुणे या पतसंस्थेची सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी झालेली निवडणूक बिनविरोध पार पडली असल्याची माहिती निवडणुक निर्णय अधिकारी एस. बी. भुजबळ यांनी दिली. निवड झालेले संचालक मंडळ पुढीलप्रमाणे - अध्यक्षपदी शेळके चंद्रकांत पुनाजी (कोळवाडी), उपाध्यक्षपदी थोरात उज्चला तुकाराम (माळेगाव), सचिव पदी नवले विजय सर्जेराव (चावंड), खजिनदार पदी घोलप अविनाश खंडू (फुलवडे) व सदस्य पदी नाईकवाडी भरत भागुजी (आलमे), लोहकरे विजय मारुती (फुलवडे), हांडे संजय श्रीपत (कामशेत), भालेघरे विकास कृष्णा (माळेगाव), गायकवाड संतोष रामकिशन (तळेरान), फल्ले प्रशांत सोमनाथ (ओतूर), जोशी दत्तात्रय सोनू (तळेरान), ऐनोर भाऊसाहेब पांडुरंग (चावंड), पाठक प्रेमकला वैभव (कामशेत), काकडे रविंद्र गहिनीनाथ (आलमे), डोळे महादेव नारायण (कोळवाडी).

घोडेगाव प्रकल्पांतर्गत असलेल्या ओतूर, कोळवाडी, आलमे, चावंड (जुन्नर), तळेरान (सर्व ता. जुन्नर), कामशेत व माळेगाव (ता. मावळ) व फुलवडे (ता. आंबेगाव) येथील आश्रमशाळेतील कर्मचारी या पतसंस्थेचे सभासद आहेत.

# भिवंडीतील स्टेम वॉटर प्लांटमधील क्लोरीन वायूगळतीमुळे पाच कर्मचारी बाधित

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



भिवंडी : सार्वजनिक गणेशोत्सवाची धावपळ केल्यानंतर विश्रांती घेत असतानाच भिवंडी शहरातील कल्याण रोड येथील टेमघर मधील भिवंडी, ठाणे, मीरा भाईंदर महापालिकेच्या संयुक्तिक स्टेम वॉटर प्लांट येथे क्लोरीन वायूगळती झाल्याची खळबळजनक घटना मध्यरात्री भिवंडीत घडली त्यामुळे महापालिका कर्मचारी व अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन सदर वायू गळती थांबवून होणारा पुढील अनर्थ टाळला, मात्र या वायू गळतीमुळे येथील पाच कर्मचाऱ्यांना बाधा झाल्याने त्यांची प्रकृती बिघडली होती त्यामुळे त्यांना तातडीने प्राथमिक उपचारासाठी दाखल करण्यात आले असुन त्यांची तब्येत स्थिर आहे. पोलिसांनी या घटनेची नोंद घेऊन चौकशी सुरू केली आहे.

भिवंडी कल्याण महामार्गावरील टेमघर येथे वायूगळतीची माहिती मिळताच भिवंडी मनपाचे अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, पाणी पुरवठा कार्यकारी अभियंता संदीप पटनावर, आपत्कालीन विभाग प्रमुख शाकीब खरबे,शांतीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड, स्थानिक नगरसेवक बाळाराम चौधरी यांच्या सह पालिका अधिकारी व अग्निशमन दल,मुख्य आपत्कालीन कक्षातील कर्मचारी, सुरक्षा अधिकारी तसेच शांतीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले होते.या दुर्घटनेत पाच कर्मचारी बाधित झाले असून त्यात वॉचमन अखिलेश मिश्रा, केमिस्ट फिल्टर प्रकाश पाटील, हेल्पर ऋषिकेश म्हात्रे, फिल्टर हेल्पर विपुल चौधरी व पीएसई हेल्पर जयवंत चौधरी यांचा समावेश आहे.तसेच शेजारील इमारतीमधील काही नागरिकांना सुद्धा या क्लोरिन गळतीचा त्रास जाणवत होता.त्यामुळे त्यांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले.

या बाधित कर्मचाऱ्यांना तत्काळ उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.यातील तीन कर्मचाऱ्यांना उपचार करून सकाळी घरी सोडण्यात आले असून दोघांवर उपचार सुरु असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती.सुरक्षेच्या कारणासाठी आसपासचा परिसर देखील खाली करण्याच्या सूचना देण्यात आली होत्या.अग्निशमन दलाच्या जवानांकडून वायू गळती तत्काळ थांबवण्यात आल्याने पुढील धोका टळला असल्याची माहिती पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी संदीप पटनावर यांनी दिली.घटनास्थळी रहदारी थांबवण्यासाठी सुरक्षा पट्टी बांधून अग्निशमन जवानांनी वायू गळती थांबवून परिस्थिती नियंत्रणात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

शहरातील टेमघर येथे भिवंडी, ठाणे , मीरा भाईंदर मनपाचे स्टेम प्राधिकरण हे संयुक्तिक प्लांट असून येथे रात्री वायू गळती झाल्याने पाच कर्मचाऱ्यांची प्रकृती बिघडली होती.यापैकी तीन जणांवर उपचार करून रात्रीच घरी सोडण्यात आले असून दोघांवर रुग्णालयात उपचार सुरु असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. वायू गळती रात्रीच नियंत्रणात आणण्यात आली आहे अशी प्रतिक्रिया भिवंडी मनपा पाणी पुरवठा विभागा चे कार्यकारी अभियंता संदीप पटनावर व आपत्कालीन विभाग प्रमुख शाकीब खरबे यांनी दिली. दरम्यान पोलिसांनी या घटनेची गंभीर दखल घेत नोंद घेऊन पुढील चौकशी सुरू केली आहे.

# शहापूरमध्ये अपघातात तीन ठार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग व मुंबई-नाशिक महामार्गावर झालेल्या दोन वेगवेगळया अपघातांत तिघांचा मृत्यू झाला. समृद्धी महामार्गावर मुंबईच्या दिशेने उभ्या असलेल्या ट्रकला पाठीमागून येणाऱ्या भरधान ट्रकने जोरदार धडक दिली. हा अपघात सोमवारी (ता. ८) मध्यरात्रीच्या सुमारास घडला. यामध्ये ट्रकचालक व सहाय्यकाचा (क्लीनर) मृत्यू झाला. तर मुंबई-नाशिक महामार्गावर कॅनमधील डिझेल पिकअपमध्ये भरल्यानंतर रस्त्यालगत बाजूला उभे असणाऱ्या चालकाला पाठीमागून येणाऱ्या ट्रकने जोरदार धडक दिली. यामध्ये हा चालक जागीच ठार झाला. ही घटना मंगळवारी (ता. ९) पहाटे घडली. याबाबत शहापूर पोलिस अधिक तपास करीत आहेत. समृद्धी महामार्गावर मुंबई वाहिनीवर कासगावच्या हद्दीत झालेल्या अपघातात चालक विजय उईके (वय ३८, रा. गोंदिया) आणि ओंकार पंढरे (वय) या दोघांचा मृत्यू झाला. तर मुंबई-नाशिक महामार्गावर चांदे गावाजवळ मंगळवारी पहाटे ५ वाजताच्या सुमारास झालेल्या अपघातात पिकअप वाहनामधील जावेद शेख (वय ३५, रा. धसई, तालुका शहापूर) याचा मृत्यू झाला.

# मुरबाड : खेड येथील शेतकऱ्याचे घर कोसळले

## पंचनामा करून नुकसान भरपाई देण्याची प्रकाश पवारांची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



मुरबाड(दिलीप पवार) : मुरबाड तालुक्यातील बुरसुंगे ग्रामपंचायत अंतर्गत खेड येथील सुरेश नामदेव हंबीर या गरीब शेतकऱ्याचे सतत पडणार्या पावसामुळे घर कोसळले असून त्याच्यावर बेघर होण्याची वेळ आली आहे.

गेल्या चार-पाच दिवसात सतत पडणाऱ्या पावसामुळे बुरसुंगे ग्रामपंचायत मधील खेड या गावातील या गरीब शेतकऱ्याचे घराचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यामध्ये घरातील अन्नधान्य, कपडे,भांडी, घराचे पत्रे, विटा असे नुकसान झालेले दिसून येत आहे. याबाबत माळ ग्रामपंचायतचे उपसरपंच किसन शिद यांनी घटनेची पाहणी करून व्हाट्सअपद्वारे फोटो व माहिती सामाजिक कार्यकर्ते प्रकाश पवार यांना दिली. परंतु सदर ठिकाणी कोणताही शासकीय कर्मचारी नुकसान झालेल्या घटनेची पाहणी करण्यासाठी गेला नव्हता. या घटनेची दखल घेऊन महसुल विभागाच्या वतीने तात्काळ पंचनामा करावा व नुकसान भरपाई देण्याची मागणी प्रकाश पवार यांनी मुरबाडचे तहसीलदार अभिजित देशमुख यांना सोशल माध्यमाद्वारे केली आहे.

# शालेय कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे प्रस्ताव ६ महिने अगोदर शिक्षण विभागात सादर करावे - सुधीर घागस

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे : सेवानिवृत्तीनंतर लगेचच निवृत्तीवेतन सुरु व्हावे जेणेकरून निवृत्त कर्मचाऱ्यास आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागणार नाही अशी तरतूद महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मध्ये केलेली आहे. असे असतांना मुख्याध्यापकांच्या बाबतीत काही संस्थाचालक व कर्मचाऱ्यांच्या बाबतीत काही मुख्याध्यापक नियोजित वेळी निवृत्तीवेतन प्रस्ताव आपल्या कार्यालयात सादर करीत नाहीत. त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन मिळण्यास विलंब होत असतो. याबाबतीत काही न्यायालयीन प्रकरणेही झालेली आहेत. शालेय कर्मचाऱ्यांस न्याय मिळण्यासाठी मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीचे प्रस्ताव निवृत्तीच्या ६ महिने अगोदर शिक्षण विभागात सादर करावे अशी मागणी शिक्षक क्रांती संघटनेच राज्य अध्यक्ष सुधीर घागस यांनी ठाणे जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) देविदास महाजन यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सर्व संस्थाचालक व मुख्याध्यापक यांना निवृत्तीवेतन नियमावलीचा संदर्भ देऊन पत्र निर्गमित करावे. ज्यामध्ये निवृत्तीवेतन प्रस्ताव निवृत्तीच्या ६ महिने अगोदर आपल्या कार्यालयात सादर करण्याची ताकीद द्यावी. याचे पालन न केल्यास विलंबाबाबत चौकशी करून जाणीवपूर्वक विलंब केला असल्यास संबधितांस जबाबदार धरून कारवाई करण्यात यावी. यामुळे निवृत्त होणाऱ्या शालेय कर्मचाऱ्यांना दिलासा मिळेल व त्यांच्या निवृतीनंतरच्या जीवनामध्ये येणाऱ्या संघर्षांचा सामना करावा लागणार नाही.




# क्षमता विकास कार्यशाळेत दिव्यांग उद्योजकांसाठी मार्गदर्शन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजकांसाठी क्षमता विकास कार्यशाळा अंतर्गत महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ यांच्या वतीने व अपंग विकास महासंघ महाराष्ट्र राज्य यांच्या सहकार्याने कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रातील दिव्यांग उद्योजकांसाठी एक दिवसीय क्षमता विकास कार्यशाळेचे आयोजन बेतुरकर पाडा येथील दिव्यागंच्या कार्यालयात करण्यात आले होते.

अशोक पिल्ले तसेच दिपक ध्यामा यांनी दिव्यांगांनी व्यावसाय कसा करावा तसेच बँक लोन घेण्यासाठी कोणकोणती कागदपत्रे सादर करावी याची सखोल माहिती दिली. दिव्यांगांनी छोटे मोठे व्यवसाय करण्यासाठी पुढे यावे असे आवाहन केले आहे. यावेळी महापालिकेचे समाज कल्याण अधिकारी प्रशांत गव्हाणकर, अपंग विकास महासंघाचे महाराष्ट्र अध्यक्ष अशोक भोईर, निजाम शेख, विजय भोईर, कविता कारभारी, अनिता देवरे, माधुरी क्षीरसागर, दिपक आंबटकर यांच्यासह दिव्यांग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी रित्या पार पाडण्यासाठी अपंग विकास महासंघाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.



## सीएसएमटीसमोरील चौंकाला राजकीय नेत्यांची नावे देण्यास भूमिपुत्रांची हरकत




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मराठा आरक्षण आंदोलन पार पडल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस समोरील चौकाला 'मनोज जरांगे पाटील चौक' असे नाव देण्याची मागणी काही संस्थानी केली होती. या मागणीला आगरी कोळी बांधवांनी कडाडून विरोध दर्शविला आहे.

आगरी कोळी भूमिपुत्र महासंघाचे सल्लागार मोरेश्वर पाटील यांनी सांगितले की, 'इंग्रज राजवटीत आता जेथे मुंबई टर्मिनस आहे, त्याच जागी सन १७३७ पूर्वी आमच्या मुंबादेवीचे मंदिर होते. इंग्रजांनी बेदरकारपणे मुंबाआईचे मंदिर पाडले. त्या काळच्या विचारवंतांनी भुलेश्वर येथे मंदिर बांधून देवीची पूनर्स्थापना केली.' इंग्रजांनी येथे रेल्वेसाठी मोठी ईमारत बांधली. ईग्लंडची राणी व्हिक्टोरीयाचे पुतळे उभारले. अखेर ब्रिटिशांना सत्ता सोडून जावे लागले. मुंबई मार्गेच त्यांची शेवटची तुकडी भारतातून निघुन गेली. पृष्ठभागावर दिमाखाने बसवलेला राणीचा पुतळाही चोरीस गेला. आता ती जागा रिकामीच आहे. इंग्रजांनी घुमटावर बसवलेल्या प्रोग्रेसच्या पुतळ्यावर सुध्दा १९६९ साली विज पडली, पुतळा फुटला. आता असलेला घुमटावरील पुतळा चिटकवलेला आहे. आमची देवी सत्वाची आहे. मुंबाआईच्या नावानेच या शहराला 'मुंबई' नाव मिळाले आहे. छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे टर्मिनस येथिल हि जागा आई मुंबादेवीचे मुळस्थान आहे याची जाणीव असावी. येथिल जागेला, चौकाला जरांगे पाटील यांचे अथवा कोणत्याही नेत्याचे नाव लावू नये. तसेच मुंबादेवीचा इतिहास असलेला फलक रेल्वेस्थानकात लावावा.' असेही त्यांनी सांगितले.

## वडगाव येथे साखरचौंथ गणेशोत्सवनिमित्त रंगणार भजन स्पर्धा

### सुजाता पाटणकर व प्रणिता देशमुख यांच्यात सामना

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : ॐ मित्र मंडळ वडगांव तर्फे साखरचौथ गणेशोत्सवा निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन बुधवार १०/०९/२०२५ ते शुक्रवार १२/०९/२०२५ करण्यात आले असून भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. या अडीच दिवसात बुधवार दिनांक १०/०९/२०२५ रोजी सकाळी ९.०० वा. श्रीं ची प्रतिस्थापना श्री व सौ. संग्राली रोशन नारायण पाटील यांच्या शुभहस्ते) होणार असून सकाळी ११.३० वा. महाआरती तर सायं. ६.३० ते ७.३० वा. प्रवचन ह.भ.प. रघुनाथ रसाळ महाराज यांचे होणार आहे तसेच रात्री ७.३० ते ८.०० वाअथर्वशिर्ष सामुदायिक वाचन करण्यात येणार आहे.रात्री ८ ते ८.३० वा. महाआरती तर रात्री ९.३० वा.भजन स्पर्धा होणार असल्याने यावेळी गायिका-सौ. सुजाता पाटणकर गायिका - सौ. प्रणिता देशमुख यांची भजनाची डबलबारी पहायला मिळेल आणि यांच्यात भजनाचा सामना रंगणार आहे.गुरुवार दिनांक ११/०९/२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. महाआरती सायंकाळी ६.३० ते ८.०० वा. तुळजा भवानी भजन मंडळ वडगांव यांचा भजनाचा कार्यक्रम सायं. ८.०० ते ८.३० वा. महाआरती रात्री ८.३० ते ९.०० वा. बक्षिस वितरण गणेश सजावट रात्री ९.३० वा. योगेश आग्रावकर प्रस्तुत ऑर्केस्ट्रा स्वराविष्कार तर शेवटच्या दिवशी शुक्रवार दिनांक १२/०९/२०२५ सकाळी ११.०० वा. महाआरती सायं. ४.०० वा. महाआरती भव्य मिरवणुक विसर्जन सोहळा सायंकाळी ५.०० वा. होणार असल्याने वडगाव परिसरात आनंदमय वातावरणात तयार झाले असून या कार्यक्रमाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन ॐ मित्र मंडळ व्यायाम शाळा वडगांव-पेण यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## मुलुंड येथे बाल कलाकारांची 'सुगम संगीत संध्या'

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




मुबंई : मुंबई महापालिकेतील मुलुंड येथे सेवा राम लालवानी शाळेमध्ये शिक्षण घेणारी माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी कुमारी अनुश्री जाधव हिचा सुंदर आवाज आणि गाण्याकडे संगीत विषयाकडे जास्ती ओढ आहे हे लक्षात घेऊन तिचा गाण्याचा कार्यक्रम सुगम संगीत संध्या आयोजित केला होता. यामध्ये भावगीत ,भक्तिगीत ,लावणी आणि गझल सुद्धा .....यांचा समावेश होता. या कार्यक्रमाची संकल्पना संतोष आगटे* यांची होती. या कार्यक्रमात मेधा दिवेकर (कथक नृत्य आर्टिस्ट मुलुंड)यांच्या विद्यार्थिनींनी कथक नृत्य खूप सुंदर रित्या सादर केले आणि रसिकांची दादही मिळवली. याप्रसंगी संगीत क्षेत्रातले व सामाजिक कार्यातील अनेक स्थानिक मान्यवर रसिक श्रोते आणि पत्रकार आवर्जून उपस्थित होते. त्यांनी बालकलाकार अनुश्री चे भरभरून कौतुक करून बक्षिसेही दिली. कीबोर्ड वर पाटील व शिधये तबला - संतोष आगटे व ढोलक ढोलकी विनय चौगुले यांची समर्पक अशी संगीत साथ लाभली. कार्यक्रमाची संकल्पना व संयोजक संतोष आगटे (निदेशक मुंबई महापालिका शिक्षण विभाग) व सहसंयोजक विनय चौगुले (निदेशक संगीत विभाग मुंबई महानगरपालिका) यांचे होते. या कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन गौरी आठल्ये यांचे होते. या कार्यक्रमासाठी या शाळेच्या मुख्याध्यापिका प्रजापती यांचे पण अनमोल सहकार्य लाभले. अनेक मान्यवरांचे सत्कार करण्यात आले.अशा या कार्यक्रमात सर्व रसिक मंत्रमुग्ध झाले होते.

## भारतीय संविधान अमृतमहोत्सव व अंमलबजावणी विषयावर मार्गदर्शन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : भारतीय बौद्ध महासभा कल्याण तालुक्याच्या वतीने भव्य स्नेहसंमेलन व जाहीर सत्कार समारंभ रविवारी संपन्न झाला. दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया ठाणे जिल्हा अंतर्गत शाखा कल्याण तालुका पुरुष व महिला कार्यकारिणीच्या वतीने आनंदवाडी आनंद बुद्ध विहार, कल्याण पूर्व याठिकाणी कल्याण तालुका अंतर्गत सर्व शहर, वार्ड ,ग्राम शाखेतील पदाधिकारी, बौद्धाचार्य, केंद्रीय शिक्षक शिक्षिका, सैनिक, उपासक उपासिका, सभासद व हितचिंतक यांचा भव्य स्नेहसंमेलन व जाहीर सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

स्वागताध्यक्ष कल्याण तालुका महिला अध्यक्षा पंचशीला सुरवाडे यांनी भूषविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरचिटणीस जी.एम राजगुरू यांनी उत्कृष्टपणे पार पाडले. या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून अ‍ॅड. डॉ.जगदीश गवई (राष्ट्रीय उपाध्यक्ष) आणि सुप्रिया कासारे (उपप्रमुख केंद्रीय प्रशिक्षण विभाग) हे होते. कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिती म्हणून सुषमा पवार (राष्ट्रीय उपाध्यक्षा),अविंदा वाघमारे (महाराष्ट्र राज्य संस्कार सचिवा), लेफ्टनंट कमांडर विनिता निखिल साळवी - माने(महाराष्ट्र राज्य संरक्षण उपाध्यक्षा या सैनिकी गणवेशात उपस्थित होत्या.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून अ‍ॅड.डॉ. जगदीश गवई यांनी भारतीय संविधान अमृतमहोत्सव व अंमलबजावणी हा विषय आपल्या विशिष्ट अभ्यासू शैलीतून उत्कृष्टपणे सहजसोप्या पद्धतीने मांडला. सुषमा पवार राष्ट्रीय उपाध्यक्षा,अविंदा वाघमारे महाराष्ट्र राज्य संस्कार सचिव, शीला तायडे ठाणे जिल्हा महिला अध्यक्षा, विजय गायकवाड ठाणे जिल्हा अध्यक्ष, ठाणे जिल्हा माजी अध्यक्ष- के.पी. गायकवाड, जगदीश जाधव,ऐ.जी. तायडे यांनी शुभेच्छा दिल्या.

कल्याण तालुका अंतर्गत सर्व शहर, वार्ड, ग्राम शाखा ज्यांनी अविरतपणे धम्म कार्य गतीमान करण्यासाठी व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची भारत बौद्धमय करण्याची संकल्पना पूर्ण करण्यासाठी व धम्माचा प्रचार प्रसार करण्यासाठी २४ प्रकारच्या शिबीरांच्या माध्यमातून संस्थेचे कार्य जोमाने केले व करत आहेत आणि यापुढेही कायम करणार आहेत या सर्व शाखांच्या पदाधिकार्यांचा प्रमुख मार्गदर्शक व पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह ट्रॉफी, फ्रेम केलेले सन्मानपत्र, पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार करण्यात आला.

## कृषी विभागाच्या प्रचलित योजनांमध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी अर्ज करावेत

### - जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रामेश्वर पाचे यांचे आवाहन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्माण करणे, उत्पादन खर्च कमी करणे, उत्पादकता वाढविणे, पीक विविधीकरण करणे, मूल्य साखळी बळकट करणे, तसेच हवामान अनुकूल आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन देवून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे, हा कृषी समृध्दी योजनेचा मुख्य उद्देश आहे.

**कृषी समृध्दी योजनेची ठळक वैशिष्ट्ये:-**

I. या योजनेंतर्गत उत्पादकता, शाश्वतता आणि उत्पन्न वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी प्रमुख कृषी गुंतवणूक क्षेत्रांना प्राधान्य दिले जाईल.

II. हवामान बदल अनुकूल शेती पध्दतीस प्रोत्साहन देण्यात येईल. यामध्ये सूक्ष्म सिंचन, हवामान अनुकूल बियाणे, पिकांचे वैविध्य, जमिनीची सुपीकता व्यवस्थापन, कमी खर्चीक यांत्रिकीकरण व मजबूत मूल्यसाखळी तयार करण्यावर भर.

III. याशिवाय, डिजीटल शेती, काटेकोर शेती, यंत्रसामग्री सेवा, कृषी हवामान सल्ला सेवा, गोदाम व लॉजिस्टिक्स, प्रक्रिया व निर्यात यांवर तसेच, तंत्रज्ञान प्रसारासाठी नवोन्मेष केंद्र (Innovation Hub) स्थापन करण्यावर भर.

IV. शेतकऱ्यांचे निव्वळ उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने योजनांची आखणी व अंमलबजावणी.

V. निर्यात वृध्दीच्या दृष्टीने गुंतवणुकीस प्रोत्साहन.

VI. योजनेची सुरळीत अंमलबजावणी आणि दीर्घकालीन अवलंब सुनिश्चित करण्यासाठी क्षेत्रीय कर्मचारी आणि शेतकऱ्यांसाठी क्षमता बांधणीवर भर.

VII. योजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या अनुदानित घटकांसाठी केंद्र व राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या घटकातील देय अनुदान प्रमाण व मर्यादा लागू राहील. जिथे प्रचलित मापदंड नाहीत किंवा आहे ते मापदंड अपुरे आहेत, त्या ठिकाणी मापदंड निश्चिती ही राज्यस्तरीय समितीमार्फत करण्यात येईल.

VIII. या योजनेत भाग घेण्यासाठी सर्व शेतकऱ्यांना Agristack नोंदणी क्रमांक आवश्यक राहील. तसेच, वनहक्क कायद्यांतर्गत (FRA) वैयक्तिक वनहक्क प्राप्त शेतकऱ्यांची Agristack नोंदणीची सोय झालेली नाही, अशा वैयक्तिक वनहक्क प्राप्त शेतकऱ्यांसाठी पर्यायी व्यवस्था निर्माण करण्यात येईल.

IX. या योजना DBT (थेट लाभ हस्तांतरण) प्रणालीव्दारे राबवण्यात येईल.

X. तसेच योजनेत प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (First-come-first-served) या तत्वावर लाभ देण्यात येईल.

XI. योजनेंतर्गत शेतकरी/महिला गट, उत्पादक कंपन्या यांना प्राधान्य.

XII. अल्प, अत्यल्प भूधारक, महिला शेतकरी, अनुसूचित जाती, जमातीचे शेतकरी आणि दिव्यांग शेतकरी यांना प्राधान्य राहील. या प्राधान्यक्रमाचा महा-डिबीटी आयटी प्रणालीमध्ये समावेश असेल.

XIII. योजनांचे समवर्ती मूल्यमापन बाह्य संस्थेकडून करण्यात येईल.

**ठाणे जिल्हयाकरीता अपेक्षित निधी वितरण:-**

घटक:- वैयक्तिक, तसेच, सामुहिक गुंतवणुकीच्या घटकांवर आधारित कार्यान्वित असलेल्या प्रचलित योजनांसाठी, निधी (रु.कोटी) - रु.55.69, टक्केवारी (%) - 80%.

घटक:- जिल्हास्तरावरील स्थानिक गरजा लक्षात घेवून गरजेनुसार तयार करण्यात येणाऱ्या योजनांसाठी, निधी (रु.कोटी) - रु.6.96, टक्केवारी (%) - 10%.

घटक:- राज्यातील कृषी विकासाठी आवश्यक संशोधन व इतर महत्तवपूर्ण गुंतवणूकीच्या दृष्टीने प्रकल्प आधारित राज्यस्तरीय योजना, टक्केवारी (%) - 10%.

कृषी समृध्दी योजनेसाठी राज्यस्तरावर सन 2025-26 पासून पुढील 5 वर्षामध्ये दरवर्षी रु.5000 कोटी या प्रमाणे तरतूद उपलब्ध होणार असून ठाणे जिल्ह्याकरीता स्थानिक गरजांवर आधारित योजनांसाठी 6.96 कोटी व वैयक्तिक, सामुहिक गुंतवणुकीच्या प्रचलित योजनांसाठी 55.69 कोटी या प्रमाणे निधी उपलब्ध होणार आहे. त्यानुसार जिल्हास्तरीय समितीच्या मार्फत स्थानिक गरजांवर आधारित योजनांकरीता प्रकल्प अहवाल तयार करण्यात येणार आहेत. कृषी समृध्दी योजनेमधून निधी उपलब्ध होणार असल्याने महाडीबीटी पोर्टलवर राबविण्यात येणाऱ्या कृषी यांत्रिकीकरण, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजना इ. कृषी विभागाच्या प्रचलित योजनांमध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी पोर्टलवर आवश्यक घटकांकरीता अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रामेश्वर पाचे यांनी केले आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी अ‍ॅण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

## 'वोट चोरी म्हणजे लोकशाहीवर प्रहार' - रमझान शेख

### रमझान शेख यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी विरोधात स्वाक्षरी मोर्चा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : सध्या देशभरात काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी उचललेले वोट चोरीविरुद्धचे पाऊल लक्षात घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले. राष्ट्रवादी कांग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा विधिमंडळ गटनेते आमदार जितेंद्र आव्हाड तसेच ठाणे जिल्हा अध्यक्ष सुहास देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र प्रदेश संघटक सचिव रमझान शेख यांच्या नेतृत्वाखाली जनतेने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयांमध्ये मोठ्या संख्येने एकत्र येऊन वोट चोरीविरोधात स्वाक्षरी करून आपला ठाम निषेध नोंदविला. या अभियानाच्या माध्यमातून लोकशाहीचे संरक्षण आणि जनतेचा विश्वास टिकवून ठेवणे हाच पक्षाचा उद्देश असल्याचे रमझान शेख यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, "लोकशाही मजबूत राहण्यासाठी जनतेचा प्रत्येक मताचा अधिकार अबाधित राहणे गरजेचे आहे. वोट चोरी हा लोकशाहीवरचा घातक प्रहार असून त्याविरोधात प्रत्येक कार्यकर्त्याने लढा दिला पाहिजे."

## जिल्हा माहिती कार्यालयातील रद्दी खरेदी करण्यासाठी दरपत्रके सादर करावीत


दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे जिल्हा माहिती कार्यालयातील जुनी रद्दी व इतर साहित्य विहीत पध्दतीचा अवलंब करुन निर्लेखित करुन विक्री करावयाची आहे. ही रद्दी दि.9 सप्टेंबर ते दि.12 सप्टेंबर 2025 या कालावधीत कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध असेल. (अधिक माहितीसाठी वरिष्ठ लिपीक श्री.अविनाश सकपाळ, मो. क्र. 8369707572 यांच्याशी संपर्क साधावा.)

इच्छुक रद्दी खरेदीदारांनी कार्यालयीन वेळेत सिलबंद लिफाफ्यातील दरपत्रके जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, स्टेट बँकेच्या वर, ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय आवार, कोर्ट नाका, ठाणे (प.) येथे शुक्रवार, दि.12 सप्टेंबर 2025 रोजी संध्याकाळी 4 वाजेपर्यंत जमा करावेत, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप यांनी केले आहे.

## शिव विस्ता होम्स प्रकल्पाच्या माध्यमातून समाजाभिमुख उपक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



शहापूर ग्रामीण(नरेंद्र पाटील) : नवी मुंबई येथील प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक बाविस्कर ग्रुप यांनी वासिंद (पूर्व) भागात सुरू केलेल्या शिव विस्ता होम्स या प्रकल्पाच्या माध्यमातून समाजाभिमुख उपक्रम राबवला गेला. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर वासिंद व परिसरातील बाप्पाच्या लाडक्या भक्तांसाठी पाच दिवस व त्यापेक्षा अधिक काळ घरगुती गणपती मखर सजावट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या भक्तांसाठी रोख पारितोषिके, सहभाग प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह आणि आकर्षक भेटवस्तूंची घोषणा करण्यात आली होती.

स्पर्धेचे नियम असे होते की गणेशोत्सवातील घरगुती गणपती किमान पाच दिवसांचा असावा, तो पर्यावरणपूरक असावा, सजावटीमध्ये टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू तयार केलेल्या असाव्यात तसेच सजावट ही सामाजिक किंवा शैक्षणिक संदेश देणारी असावी. या उपक्रमाला वासिंदकरांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून तब्बल पंचवीस जणांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. या स्पर्धेचे परीक्षण वासिंदमधील निवेदक व शिक्षक मुकेश दामोदरे यांनी केले. घरगुती गणपती मखर सजावट स्पर्धेत सहभागी झालेल्या स्पर्धकांच्या घरी भेट देवून परीक्षण करण्यात आले. यावेळी स्पर्धकांना भेटवस्तू आणि गिफ्ट व्हाउचर कूपन देवून सन्मानित करण्यात आले.

पाच दिवसांच्या गणपती आणि गौरी विसर्जन वेळी गणेश घाट कडे जाणाऱ्या मंडळींचे शिव विस्ता होम प्रकल्प कडून स्वागत करून त्यांना अल्पोहार आणि पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

या उपक्रमासोबतच बाविस्कर ग्रुपचा शिव विस्ता होम्स प्रकल्प सुद्धा वासिंद व परिसरातील नागरिकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. वासिंद (पूर्व) रेल्वे स्थानकापासून अवघ्या दोन मिनिटांच्या अंतरावर असलेला हा प्रकल्प वासिंदमधील पहिला १२ मजली टॉवर आहे. प्रकल्पात १ बीएचके आणि २ बीएचके अशी परवडणारी घरे उपलब्ध आहेत. आरसीसी भूकंप प्रतिरोधक बांधकामासोबत स्विमिंग पूल, योगा गार्डन, मुलांचे खेळाचे मैदान, क्लब हाऊस आणि सीसीटीव्ही सुरक्षा यांसारख्या आधुनिक सुविधा दिल्या गेल्या आहेत. हा प्रकल्प MahaRERA नोंदणीकृत (P51700080407) असून सामान्य माणसाला त्याच्या स्वप्नातील घर मिळवून देण्याचे स्वप्न प्रत्यक्षात आणतो आहे.

या उपक्रमाबद्दल विचार व्यक्त करताना बाविस्कर ग्रुपचे समूहप्रमुख प्रकाश बाविस्कर म्हणाले की, "गणेशोत्सव केवळ उत्सव राहिला नसून तो आता संपूर्ण महाराष्ट्राचा सार्वजनिक उत्सव झाला आहे. घरगुती गणपती उत्सवाला उत्तेजन मिळून निसर्ग आणि पर्यावरण यांचे संवर्धन व्हावे तसेच पुढील पिढ्यांनी त्याचे जतन करावे हा सामाजिक उद्देश लक्षात घेऊन ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती."गणेशोत्सवातील या आगळ्या-वेगळ्या उपक्रमामुळे वासिंद परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून सांस्कृतिक वारसा, पर्यावरणपूरक जीवनशैली आणि सामाजिक एकजुटीचा संदेश समाजापर्यंत पोहोचवण्यात बाविस्कर ग्रुप यशस्वी झाला आहे.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई ■ नवी मुंबई ■ ठाणे ■ पालघर ■ रायगड
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

*Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,*
*Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.*
*Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024*